# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

०५ जानेवारी, २०२०


☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7447744100 (PRO)


## अल्पवयीन मुलीस पळवुन नेवुन अत्याचार करणाऱ्या आरोपीस सश्रम कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन रामनगर अंतर्गत फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीस पळवुन नेवुन तिचेवर अत्याचार करणाऱ्या आरोपीस ०४/०१/२०२० रोजी **श्रीमती अंसारी, सत्र न्यायाधीश क्र. १ चंद्रपुर यांनी सश्रम कारावासाची** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर अंतर्गत बाबुपेठ वार्ड चंद्रपुर येथील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही दिनांक ०४/०१/२०१८ रोजी शाळेत जातो असे बोलुन घरून गेली होती. शाळा संपल्यानंतरही आपली मुलगी घरी आली नाही यामुळे फिर्यादीने शोधाशोध सुरू केली. परंतु बराच वेळ झाल्यामुळे फिर्यादींनी पोलीस स्टेशन रामनगर येथे धाव घेवुन तक्रार दिली आणि कि त्यांचे १४ वर्षाच्या मुलीला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले. अशा फिर्यादीच्या पिडीत मुलीच्या बयाणावरून पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. १८/२०१८ कलम ३६३,३६६,३७६(२)(आय),भादंविसहकलम ४,६,३(२) (व्ही), एससी, एसटी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपासादरम्यान तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर श्री. सुशिलकुमार नायक, यांनी गुन्हयातील आरोपी नामे सोनु राजु चांदेकर वय २२ रा. बाबुपेठ वार्ड चंद्रपुर यास अटक करून आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ०४/०१/२०२० रोजी **आरोपी नामे सोनु राजु चांदेकर वय २२ रा. बाबुपेठ वार्ड चंद्रपुर** यास **कलम ३७६(२)(आय) भादंवि व कलम ४ पोक्सो मध्ये १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व १,०००/—रू दंड, न भरल्यास ६ महिने शिक्षा, श्रीमती अंसारी, सत्र न्यायाधीश क्र. १ चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. देवेंद्र महाजन, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन सफौ. राजु सबळ, पोलीस स्टेशन रामनगर यांनी काम पाहिले.

---

# पोलीस स्टेशन दुर्गापुर हद्दीतील अट्टल दारूविक्रेता गुन्हेगार जिल्हयातुन तडीपार

पोलीस स्टेशन दुर्गापुर हद्दीतील उर्जानगर वार्ड क्र. ६ येथे राहणारा सराईत गुन्हेगार आणि दारूविक्रेता **प्रमोद रामलाल सुर्यवंशी, वय ४४ वर्ष** यास चंद्रपुर जिल्हयातुन ०३ महिण्यांकरीता तडीपार करण्यात आलेले आहे.

उपरोक्त आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे सन २०१४ पासुन ते आजपावेतो एकुण १२ गुन्हयांची नोंद आहे. तसेच विविध कलमान्वये त्याचे अनेकवेळा प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा करण्यात आलेली आहे. परंतु सदर ईसमावर त्याचा कोणताही परीणाम झोलेला नसुन तो पुर्ववत गुन्हे करण्याचा अधीन होता व त्याचा अवैध दारूविक्री करण्याचा गोरखधंदा सुरूच होता. तसेच लोकांसोबत आडदांड वृत्तीने मुजोरपणाने वागत असल्यामुळे गावातील व परिसरातील लोक त्याचे दहशतीखाली वावरत होते.

त्याच्या वर्तनात व अवैध दारूविक्रीच्या व्यवसायात सुधारणा होत नसल्याचे लक्षात घेवुन पोलीस स्टेशन दुर्गापुर येथुन त्याचे विरूध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६(१) (क)(ख) प्रमाणे तडीपारीचा प्रस्ताव तयार करून मा. उपविभागीय दंडाधिकारी उपविभाग चंद्रपुर यांच्या मंजुरीने **प्रमोद रामलाल सुर्यवंशी, वय ४४ वर्ष** यास चंद्रपुर जिल्हयातुन ०३ महिण्याकरीता तडीपार करण्यात आले आहे.

---